0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावं :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १३/०८/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५९/२०१२/जा.५५२, दिनांक ०९/०८/२०१२ व २३/०८/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २२/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २१/०८/२०१२ रोजीचा अहवाल.

५) मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांचे दिनांक १३/०९/२०१२ व ०१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५९/२०१२/जा. ८७७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २१ / ११ /२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०१/०८/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि., प्लॉट नं. ए-६०२, एमआयडीसी, महापे व्हिलेज, जि. ठाणे या ठिकाणी अचानक भेट दिली असता, सदर कंपनीमध्ये गोदाम व कोल्ड स्टोरेजमध्ये मे. रिका ग्लोबल इम्पेक्स लि. यांनी डाळी-कडधान्यांचा साठा ठेवलेला असल्याचे अधिकाऱ्यांना निदर्शनास आले. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अन्वये सदर डाळी-कडधान्यांचा साठा वैध आहे किंवा कसे, याबाबत खातरजमा करावयाची असल्याने त्याबाबत उपस्थित इसम यांना सदर साठ्याबाबत अभिलेख सादर करण्याच्या सुचना दिल्या असता उपस्थित इसमाने गोदामाचा अभिलेख दाखवला. तसेच कंपनीचे आयात-निर्यात व्यवस्थापक थोड्याच वेळात गोदामात उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. दरम्यान तेथे एक व्यक्ती उपस्थित झाली व ते मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. कंपनीचे आयात-निर्यात व्यवस्थापक असल्याचे व त्याचे नांव सुनिल मदन कदम असे असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सुनिल कदम याचेकडे गोदामातील मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीच्या डाळी-कडधान्याच्या साठ्याच्या अनुषंगाने घाऊक परवाना, साठा खरेदी-विक्रीची बिले, साठापुस्तक, विवरणपत्र इ. आवश्यक कागदपत्रांची चौकशी व पडताळणीसाठी मागणी केली. त्याप्रमाणे सुनिल कदम यांनी मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीच्या नांवे देण्यात आलेला संयुक्त घाऊक परवाना क्र. ४१-फ/वाशी/संप/६५९(घा) हा दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध असलेला आणि सी/२१२, २ रा मजला, प्लॉट नं. १४/क, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावर देण्यात आलेला मुळ परवाना सादर केला. अधिकाऱ्यांनी खरेदी-विक्रीच्या बिलांच्या मुळ प्रती व साठापुस्तक, विवरणपत्र बाबत त्यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी मुळ प्रती नरीमन पॉईंट, मुंबई येथील कार्यालयात असून त्यांचेकडे त्यांच्या छायाप्रती असल्याचे सांगून त्या सादर केल्या. तथापी, सदर बिलांची सत्यसत्यता पडताळण्यासाठी मुळ बिले सादर होणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी सुनिल कदम यांना पंचांसमक्ष सांगितले. बिलांच्या मुळ प्रती तो तात्काळ मुंबईतील कार्यालयातून मागवून घेतो असे सुनिल कदम यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

तद्नंतर मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीच्या नांवे देण्यात आलेल्या परवान्याची पडताळणी करुन सदर पत्त्यावर कंपनी कार्यरत आहे किंवा कसे, याची खातरजमा करण्यासाठी पथकातील अन्य अधिकारी पंचांसह सदर कामी रवाना झाले. त्यानंतर मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. चे सुनिल कदम हे रात्रो २२:३० वाजण्याच्या सुमारास मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. या गोदामातील कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना गोदामातील डाळी-कडधान्यांच्या साठ्याच्या अनुषंगाने खरेदी बिलांच्या मुळ प्रती सादर केल्या. सदर बिलांची पडताळणी केली असता, ती खालील प्रमाणे आढळली.

| अ.क्र. | बिल क्रमांक | दिनांक | मालाचे नांव | खरेदीचे ठिकाण | खरेदी साठा (बाचक्यांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११०० | १८/०५/२०१२ | चणा | देवास (मध्य प्रदेश) | ९६० |
| २ | ११०१ | १९/०५/२०१२ | चणा | देवास (मध्य प्रदेश) | ९६० |
| ३ | ७४ | २०/०५/२०१२ | चणा | रतलाम (मध्य प्रदेश) | ९६० |
| ४ | ११०५ | २२/०५/२०१२ | चणा | देवास (मध्य प्रदेश) | ९६० |
| ५ | ११०६ | २२/०५/२०१२ | चणा | देवास (मध्य प्रदेश) | ९६० |
| | | | | एकूण बाचक्यांमधील साठा | ४८०० |

सदर बिलांबाबत अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सुनिल कदम यांचेकडे अधिक चौकशी केली असता, सदरचा साठा हा मध्य प्रदेश राज्यातील देवास व रतलाम या शहरांच्या स्थानिक मंडईतून खरेदी करुन तद्नंतर निर्यात करण्यासाठी मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. या गोदामात साठवणूक केल्याचे अधिकाऱ्यांना सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमवेत गोदामातील सदर साठयाची पाहणी केली असता सदर साठा हा गोदामात

CONTROLLER OF RATIONING AND ... HEAD OFFICE MUMBAI

वेगवेगळ्या ठिकाणी ठेवलेला असल्याचे निदर्शनास आल्याने तो गोदाम मालक श्री. आदित्य धिर यांना जैसे थे ठेवण्याचे आदेश अधिकाऱ्यांनी देवून सदरचा चण्याचा साठा पंचांसमक्ष जागीच जप्त करुन त्याबाबत गोदाममालकाचे हमीपत्र घेऊन चण्याचे नमुने प्रयोगशाळेत पृथ:करणासाठी पाठविण्यासाठी ४ प्लास्टिकच्या स्वच्छ व पारदर्शक बरण्यांमध्ये नमुने घेण्यात आले.

उपरोक्त कार्यवाही चालु असतांना मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांच्या परवान्यावर नमुद असलेल्या अरिहंत कमर्शियल, ग्रोमा हाऊस, सी-२१२, प्लॉट नं. १४ सी, दुसरा माळा, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या पत्यावर पथकातील अन्य अधिकारी यांनी पंचांसमक्ष भेट देवून चौकशी केली असता, नमुद पत्यावर मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. ही कंपनी कार्यरत नसुन सदर पत्यावर मे. अरिहंत कमर्शिअल हया कंपनीचे कार्यालय असल्याचे निदर्शनास आले. तसेच तेथे उपस्थित इसम श्री. संजय पारसमल चोप्रा यांनी सदर जागेत मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचे कार्यालय किंवा गोडाऊन नसल्याचे पंचासमक्ष सांगितल्याने त्यांचा जबाब नोंदविण्यात येवून पंचनामा तयार करण्यात आला.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीस महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंन्सिग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या घाऊक परवान्यावरील व्यवसायाच्या पत्यावर व्यवसाय करीत नसल्याचे तसेच त्यांचे परवान्यावर मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. या गोदामात साठवणूक केलेल्या गोदामाची नोंदही केलेली नसल्याने मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने परवान्यामधील अटी/तरतुदींचा भंग केल्याचे व शासनाची फसवणुक केल्याचे सिध्द झाल्याने, अधिकाऱ्यांनी मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. मध्ये ठेवलेल्या कंपनीच्या कडधान्याच्या साठ्याची प्रत्यक्ष मोजदाद पंचांसमक्ष केली असता, तेथे २५ कि. प्रति बाचकी भरता प्रमाणे ४७९२ बाचक्यांमध्ये ११९८०० कि.ग्रॅ. म्हणजेच ११९८ क्विंटल इतका रुपये ६०/- प्रति किलो दरानुसार रुपये ७१,८८,०००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल आढळला.

अशाप्रकारे मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. चे संचालक श्री. सुरेशकुमार अगरवाल व संचालक मंडळ यांनी संगणमत करुन वर नमूद चणा या कडधान्याची ४७९२ बाचकी, एकूण वजन ११९८ क्विंटल एवढा साठा हा मध्यप्रदेश राज्यातील देवास व रतलाम शहारांच्या स्थानिक मंडईतून खरेदी करुन तद्नंतर निर्यात करण्यासाठी मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. या ठिकाणी अनधिकृतपणे साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०७६/२०१२ दिनांक ०२/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २१/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीच्या वतीने एक्सेकेटिव मॅनेजर श्री. ॲगस्टीनो एन. फर्नांडिस तसेच इम्पोर्ट एक्सेकेटिव श्री. सुनील मदन कदम व मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. चे संचालक श्री. आदित्य धिर हे उपस्थित राहिले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. सुनावणीस उपस्थित मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. चे संचालक श्री. आदित्य धिर यांनी सदरचा जप्त चणाचा साठा हा नमूद कंपनीचा असून त्यांनी साठा ठेवून घेतल्यानंतर साठा मालकास साठा ठेवल्याची पावती दिली असून सदर साठ्याशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून साठ्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे सांगितले. तथापी, मे. रिका ग्लोबल इम्पेक्स लि. च्या वतीने सुनावणीस उपस्थित अधिकाऱ्यांना कंपनीच्या नावे असलेल्या घाऊक परवानाबाबत विचारणा केली की, घाऊक परवाना हा Table Space साठी घेऊन घाऊक परवानानुसार खरेदी केलेल्या कडधान्याचा साठा हा ठेवण्याचे प्रयोजन काय ? तसेच परवानावर वेगळे गोदामाची नोंद नाही. तरीही सदर कंपनी या कडधान्याचा साठा परवानामध्ये नमूद नसलेल्या गोदामावर ठेवण्यास परवानगी घेतली होती किंवा कसे या सर्व प्रश्नांबाबत त्यांनी माहित नसल्याचे सांगून याबाबत सर्व इत्यंभूत माहिती कंपनीचे संचालक सुरेशकुमार अगरवाल हे देऊ शकतील. परंतू सद्या ते बाहेरगावी असल्याने पंधरा दिवसानंतर सुनावणी ठेवण्याची विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ११/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. आर. एन. जगताप, तुर्भे पोलिस ठाणे यांनी उपस्थित राहून यापूर्वीच वाचावे क्र. ३ अन्वये अभिवेदन टपालामार्फत सादर केले असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. चे संचालक सुरेश कुमार अगरवाल यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन पुढील दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले.

तद्नंतर टपालामार्फत मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदने प्राप्त झाली. सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २२/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याचा तपास चालू असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ खाली दाखल गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ६-अ अन्वये आपणांस असल्याने सदरचा मुद्देमाल हा नमूद कायद्यातील तरतुदी प्रमाणे सरकार जमा करावा अगर यातील मुळ मालकास परत देणे बाबतचा योग्यतो निर्णय घेण्यात त्यांची काहीएक हरकत नाही, असे नमूद केले आहे.

अनुज्ञप्ती प्राधिकारी असलेले उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या अहवालात, फिरते पथकाच्या अधिकाऱ्यांनी मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांच्या नावे असलेले अनुज्ञप्तीतील सी-२१२, २ रा मजला, प्लाट नं. १४-क, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावर पंचांसमवेत भेट देऊन चौकशी केली असता, नमूद कंपनी सदर ठिकाणी व्यवसाय करीत नसल्याचे पथकास निदर्शनास आले. अनुज्ञप्तीधारकाने अनुज्ञप्तीतील नमूद व्यवसायाच्या पत्त्यावरच व्यवसाय करणे बंधनकारक आहे, असे असताना नमूद व्यवसायाच्या पत्त्यावर व्यवसाय न करणे ही गंभीर बाब असून महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या आदेशातील खंड ४ (२) नुसार विहित केलेल्या अनुज्ञप्तीतील अट क्रमांक १ व २ चा भंग केलेला आहे. सबब, मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीस देण्यात आलेली अनुज्ञप्ती रद्द का करण्यात येऊ नये, अशाबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीस बजावून दिनांक १३/०८/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सुनावणीच्या वेळी कंपनीच्या वतीने उपस्थित प्रतिनिधीने फिरते पथकाच्या अधिकाऱ्यांना चौकशी दरम्यान श्री. संजय चोप्रा यांनी सदर जागा मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांना एक वर्षाकरिता भाडेकराराने दिली होती. याबाबतची माहिती विचारली असता, सदर जागेचे भाडेकरारपत्र नुतनीकरण केले किंवा कसे, याबाबत मला माहिती नसल्याचे उपस्थित प्रतिनिधीने सांगितले. त्यामुळे सद्य:स्थितीत अनुज्ञप्ती घेते वेळी जागेसंदर्भात सादर केलेल्या करारनाम्याचे नंतरच्या कालावधीमध्ये नुतनीकरण झालेले नाही व सदर ठिकाणी जागा मालक श्री. संजय चोप्रा हेच व्यवसाय करीत असल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी सदर जागा मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीच्या ताब्यात नसल्याचे स्पष्ट होत असून त्याठिकाणी नमूद कंपनी व्यवसाय करीत नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. सबब, महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीस अन्नधान्य, डाळी/कडधान्याची घाऊक अनुज्ञप्ती क्र. ४१ फ/वाशी/सं.प./६५९ (घा) ही अनुज्ञप्ती रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्याचे आदेश पारीत केल्याचे नमूद केले आहे.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांचे दिनांक १३/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, यापूर्वीच्या सुनावणीस विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने कंपनीचे संचालक सुरेश कुमार अगरवाल यांनी सादर केलेल्या उत्तरात त्यांनी अन्नधान्य व डाळी/कडधान्यासाठी वाशी येथील नमूद पत्त्यावरील Table Space साठी घेतली असून सदर जागेचे ते भाडे अदा करीत आहेत. अनुज्ञप्तीवरील नमूद पत्त्यावर कार्गोमधील साठ्याची साठवणूक शक्य नसल्याने त्यांनी नमूद गोदामावर साठवणूक केले असल्याचे नमूद केले आहे. सदर साठा निर्यात करावयाचा असल्याने निर्यातीकरीता परवान्याची गरज नसल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला काबुली चण्याचा साठा हा नाशवंत असल्याने मुक्त करण्याची विनंती केली. तसेच दिनांक ०१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस कंपनीच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्या अनुषंगाने लेखी निवेदन सादर करीत असून सदर साठ्याचे मुळ बिले व चलन हे घटनास्थळी धाडीच्या वेळी ताब्यात घेण्यात आले आहेत. सदर प्रकरणी जप्त साठा हा गोदामात सिलबंद असल्याने त्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०१/०८/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार अधिकाऱ्यांनी पंचांसह मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि., प्लॉट नं. ए-६०२, एमआयडीसी, महापे व्हिलेज, जि. ठाणे या ठिकाणी अचानक भेट देऊन तपासणी केली असता, मोठया प्रमाणावर डाळी व कडधान्याचा साठवणुक केल्याचे आढळून आले. सदर साठयाबाबत मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीचे उपस्थित झालेले सुनिल कदम यांचेकडे चौकशी केली असता मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीच्या नांवे सी/२१२, २ रा मजला, प्लॉट नं. १४/क, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई या पत्यावर महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसंन्सिग ऑर्डर १९९८ अन्वये देण्यात आलेला संयुक्त घाऊक परवाना क्र. ४१-फ/वाशी/संप/६५९(घा) हा दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध असल्याचे आढळले. साठवणुक केलेल्या साठयाच्या खरेदी-विक्रीच्या बिलांच्या मुळ प्रती व साठापुस्तक, विवरणपत्र बाबत त्यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी सादर केलेल्या खरेदी बिलांच्या मुळ प्रतींची पडताळणी केली असता, एकूण ४८०० बाचक्यांमधील चणा या कडधान्याचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले. तद्नंतर मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. या कंपनीच्या नांवे देण्यात आलेल्या परवान्याची पडताळणी करुन सदर पत्त्यावर कंपनी कार्यरत आहे किंवा कसे, याची खातरजमा परवान्यावर नमुद असलेल्या अरिहंत

कमर्शियल, ग्रोमा हाऊस, सी-२१२, प्लॉट नं. १४ सी, दुसरा माळा, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या पत्यावर मे. रिका ग्लोबल इम्पेक्स लि. या कंपनीचे कार्यालय किंवा गोडाऊन नसल्याचे आढळले. अशाप्रकारे मे. रिका ग्लोबल इम्पेक्स लि. चे संचालक श्री. सुरेशकुमार अगरवाल व संचालक मंडळ यांनी संगणमत करुन वर नमूद चणा या कडधान्याची ४७९२ बाचकी, एकूण वजन ११९८ क्विंटल एवढा साठा हा मध्यप्रदेश राज्यातील देवास व रतलाम शहरांच्या स्थानिक मंडईतून खरेदी करुन तदनंतर निर्यात करण्यासाठी मे. व्हिनस आईस ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. या ठिकाणी अनधिकृतपणे साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन रुपये ७१,८८,०००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७.(अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध होते व तद्नंतर अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेबाबत लागु केलेले निर्बंध हे हया वस्तु आयात केल्यास त्यावर लागु राहणार नाहीत. तसेच आयात वस्तुंचा व्यापार करण्यासही प्रतीबंध राहणार नाही. मात्र त्या व्यापाऱ्यांना मासीक विवरणपत्र भरण्यास सांगण्यात यावे असे नमुद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय

करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे" असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडून अन्नधान्य व कडधान्याच्या खरेदी, साठवणूक व विक्रीच्या व्यवसायासाठी घाऊक परवाना घेतला असल्याचे दिसून येते. तथापी, सदरचा परवाना हा नमूद कंपनीने सी-२१२, २ रा मजला, प्लाट नं. ३४-क, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावरील Table Space साठी घेतला आहे. वास्तविक पाहता Table Space असलेल्या ठिकाणी अन्नधान्य अथवा कडधान्याची साठवणूक करणे ही अशक्य बाब आहे. परंतू मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने सदर परवान्यावर अतिरिक्त गोदामाची नोंदही करुन न घेतल्याचे आढळून येते.

प्रस्तूत प्रकरणी, अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने अनुज्ञप्तीवरील नमूद पत्त्यावर असलेल्या भाडे करारनाम्याचे नुतनीकरण करुन घेतले नसल्याचे नमूद आहे. तसेच या कार्यालयाचे अधिपत्याखालील फिरत्या पथकानेही अनुज्ञप्तीवरील पत्त्यावर भेट दिली असता सदर पत्त्यावर कंपनीचा व्यवसाय कार्यरत नसल्याचे आढळून आले असून सदर ठिकाणी नमूद जाग्याचे मालक श्री. संजय चोप्रा हेच व्यवसाय करत असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने नमूद पत्त्यावर घाऊक परवाना घेऊन केवळ सोपस्कर पूर्ण केल्याचे तसेच त्यांनी इतर ठिकाणी व्यवसाय करुन तसेच इतर वेअरहाऊसमध्ये विनापरवानगी कडधान्यांच्या साठ्याची साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणूक करुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

COLLECTOR OF RATIONING HEAD OFFICE MUMBAI

Chickpea च्या व्याख्येमध्ये There are two main kinds of chickpea: Desi, which has small, darker seeds and a rough coat, cultivated mostly in the Indian subcontinent. Kabuli, which has lighter coloured, larger seeds and a smoother coat, mainly grown in Suthern Europe, Northern Africa, Afghanisthan, Pakistan and Chile. The Desi (meaning "country" or "local" in Hindi) is also known as Bengal Gram or Kala Chana, असे नमुद आहे. शासन आदेश क्रमांक ईसीए-१००९/१६४०/प्र.क्र.५००/ना.पु.२३ दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये पारीत केलेल्या महाराष्ट्र डाळी, खाद्यतेलबिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (द्वितीय सुधारणा) आदेश, २०१० नुसार काबुली चणा वगळण्यात आले

आहे. तसेच केंद्र शासनाच्या निर्यात धोरणानुसार काबुली चणा वगळुन इतर सर्व कडधान्यांच्या निर्यातीवर निर्बंध आहेत.

उपरोक्त गुन्ह्यात कारवाईच्या वेळी ताब्यात घेण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने मध्यप्रदेश राज्यातील देवास व रतलाम शहरांच्या स्थानिक मंडईतून चणा या कडधान्याचा साठा खरेदी केल्याचे दिसून येते. सदर खरेदी पावत्यांपैकी कृषी उत्पन्न बाजार समिती, देवासच्या पावती क्र. ३०८०६० व ३०८१४४ तसेच मे. इंद्रप्रस्त फुडस् लि. यांच्या नावे निर्गमित केलेल्या दिनांक १८/०५/२०१२, १९/०५/२०१२ व २२/०५/२०१२ या मुळ पावत्यांवर चणा लिहिला असताना त्यामध्ये हेतूपुरस्सर अनधिकृतरित्या फेरफार करुन काबुली चणा लिहिल्याचे आढळून येते. यावरुन मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने चणा ही अनुसुचित वस्तू असल्याने व त्याच्या निर्यातीस परवानगी नसल्याने त्यांनी जाणूनबूजून काबुली चणा अशी फेरफार करुन सदरचा साठा हा काबुली चणा असल्याचे तसेच तो निर्यात करीता असल्याचे भासवून त्यांनी या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीने नमूद गोदामात साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्रही सादर न केल्याचे दिसुन येते. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परिपूर्ण अहवालात, सदर साठा मालकाने अवैध साठवणूक केली असल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केला असल्याचे निष्पन्न झाल्याने मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या नावे देण्यात आलेला संयुक्त परवाना रद्द करुन त्यापोटी भरण्यात आलेली अनामत रक्कम शासनजमा करण्याचे आदेश पारीत केले आहे. सबब, मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा जप्त करण्यात आलेला चणा या कडधान्याचा अवैध साठवणूक केलेला संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०७६/२०१२ दिनांक ०२/०८/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात राहून पुढील आदेश देत आहे.

0010

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला चणा या कडधान्याचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण चणा या कडधान्याचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

**प्रति,**

१) मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. चे संचालक श्री. सुरेशकुमार अगरवाल व संचालक मंडळ
२) मे. व्हिनस आईल ॲण्ड कोल्ड स्टोरेज प्रा.लि. चे मालक/भागीदार
३) मे. रिका ग्लोबल इंपेक्स लि. कंपनीचे आयात-निर्यात व्यवस्थापक सुनिल मदन कदम
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

**प्रत,**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, संदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc